# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ / फाल्गुन २५, १९४४ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री** | |
| **(२)** | **वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(३)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री** | |
| **(४)** | **कृषि मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५)** | **सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(६)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३२**

---

### राज्यातील शेतकऱ्यांचा पीक विमा प्रलंबित असल्याबाबत

**(१) * १७७६० श्री.अंबादास दानवे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांची नुकसान भरपाई मिळण्याकरिता सुमारे ६ कोटी शेतकऱ्यांनी मागील ६ वर्षांत प्रत्येकी रुपये ५,६००/- इतकी रक्कम पीक विमा कंपनीस भरली असतानाही त्यांना प्रत्येकी रुपये २,९००/- इतकी रक्कम म्हणजेच सन २०२२-२०२३ या वर्षात खरीप हंगामात केवळ २५% रक्कम पीक विमा भरपाई म्हणून मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांच्या नुकसानीबाबत तक्रार करताना अडचणी येत असल्याने शेतकऱ्यांनी ऑफलाईन तक्रारी पीक विमा कंपनीकडे दिल्या असून त्यावर विमा कंपनीकडून कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना किमान विमा भरपाई म्हणून रुपये १०००/- एवढी रक्कम देण्याची तरतूद असतानाही शंभर रुपयांपेक्षा कमी पीक विमा भरपाई मिळालेल्या शेतकऱ्यांची संख्या सर्वाधिक असून राज्यभरात पीक विमा क्षेत्रात कार्यरत असलेल्या १३ खाजगी विमा कंपन्या आणि ५ सरकारी कंपन्या यांना शेतकऱ्यांच्या पीक विमा हप्त्याबरोबर केंद्र व राज्य शासनाचे अंशदान मिळून जमा करण्यात आलेल्या एकूण रुपये २ लाख २६ हजार ६७४ कोटींपैकी सदर विमा कंपन्यांनी रुपये १ लाख २५ हजार ६६२ कोटी इतक्या रकमेची पीक विमा भरपाई केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने पीक विमा देण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे बँक खाते आधार संलग्न व्हावे यासाठी क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून लाभार्थ्यांशी संपर्क साधण्यात आला असून काही लाभार्थ्यांशी संपर्क झाला नसल्याने अनेक लाभार्थी उक्त लाभापासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, विशेषत: नांदेड, परभणी, अमरावती, यवतमाळ आदि जिल्ह्यांतील अनेक शेतकऱ्यांचा पीक विमा प्रलंबित असून पीक विमा मिळत नसल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांनी ऑफलाईन दिलेल्या तक्रारीकडे दुर्लक्ष करुन विम्याची रक्कम देण्यास विलंब करणाऱ्या संबंधित विमा कंपनीवर कारवाई करुन नुकसान भरपाई देण्याबाबत व पीक विम्यापासून शेतकरी वंचित राहू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पीक विमा योजना सन २०१६-२०१७ ते २०२१-२०२२ मध्ये या मागील ६ वर्षामध्ये राज्यातील ७१९.२८ लाख शेतकरी अर्जदारांनी रक्कम रुपये ३२९२.९५ कोटी शेतकरी विमा हप्ता भरुन ४११.६५ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. योजनेंतर्गत दिनांक २१ फेब्रुवारी, २०२३ अखेर एकूण ३२४.८८ लाख लाभार्थ्यांना रक्कम रुपये १९४३८.४९ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली असून त्यापैकी ३१५.४० लाख शेतकऱ्यांना रुपये १९१४५.२६ कोटी नुकसान भरपाईचे वाटप विमा कंपनीमार्फत करण्यात आले असून उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजना सन २०२२ मध्ये राज्यातील ९६.६१ लाख शेतकरी अर्जदारांनी ५७.६४ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. योजनेंतर्गत दिनांक २१ फेब्रुवारी, २०२३ अखेर एकूण ६३.४० लाख लाभार्थ्यांना रक्कम रुपये २८२२.३२ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली असून त्यापैकी ४९.९१ लाख शेतकऱ्यांना रुपये २३०५.५४ कोटी नुकसान भरपाईचे वाटप विमा कंपनीमार्फत करण्यात आले असून उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पीक विमा योजना सन २०२२ स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत ऑनलाईन ४९०५७३३ व ऑफलाईन ३१९९११ एकूण ५२२५६४४ सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२२ मध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत प्राप्त एकूण ५२,२५,६४४ सूचनांचे सर्वेक्षण करण्यात आले असून रक्कम रुपये १७८६.६१ कोटी नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली आहे. त्यापैकी दिनांक २१ फेब्रुवारी, २०२३ अखेर रुपये १६७४.७९ कोटी वाटप करण्यात आले असून उर्वरीत रुपये १११.८२ कोटी वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पीक विमा योजना सन २०१६-२०१७ ते २०२१-२०२२ मध्ये या मागील ६ वर्षामध्ये एकूण रक्कम रुपये २८३६८.७० कोटी विमा हप्ता भरला आहे. योजनेंतर्गत लाभार्थ्यांना रक्कम रुपये १९४३८.४९ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली असून शेतकऱ्यांना रुपये १९१४५.२६ कोटी

नुकसान भरपाईचे वाटप विमा कंपनीमार्फत करण्यात आले आहे. उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात राबविण्यात येत आहे. सदर मार्गदर्शक सूचनांनुसार पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम अत्यंत कमी प्रमाणात येत असल्यास शासन निर्णय दिनांक ३१ मे, २०१९ नुसार वैयक्तीक शेतकऱ्यास विमा योजनेंतर्गत सर्व अर्ज मिळून हंगामाच्या शेवटी किमान नुकसान भरपाई रुपये १०००/- देण्यात येते.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

नांदेड, परभणी, अमरावती व यवतमाळ या जिल्हयांमध्ये योजनेंतर्गत खरीप २०२२ मध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्ती व हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या बाबी अंतर्गत नुकसान भरपाई निश्चित व वाटप तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | जिल्हा | अंतरिम नुकसान भरपाई (रुपये कोटी) | वाटप नुकसान भरपाई (रुपये कोटी) | प्रलंबित नुकसान भरपाई (रुपये कोटी) |
|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | ४६४.४७ | ३०९.१० | १५५.३७ |
| २ | परभणी | ११३.७१ | १११.७३ | १.९८ |
| ३ | अमरावती | ७२.१० | ७१.९५ | ०.१५ |
| ४ | यवतमाळ | १९६.०१ | १९५.५८ | ०.४३ |

प्रलंबित नुकसान भरपाई अदा करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सहकार आयुक्तालयातंर्गतच्या पतसंस्थांच्या कार्यक्षेत्र वाढ व शाखा विस्तार प्रस्तावांना मान्यता देताना गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२) * १६९३२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकार आयुक्तालयातील पतसंस्था शाखेत सन २०१७ ते सन २०२२ या कालावधीत पतसंस्थांच्या कार्यक्षेत्र वाढ व शाखा विस्तार प्रस्तावांना मोठ्या प्रमाणावर मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालावधीत दाखल प्रस्तावांतील पतसंस्था मूळ ताळेबंदाप्रमाणे निकष पूर्ण करत नसतानाही लेखापरिक्षकांचे बनावट प्रमाणपत्र घेऊन त्याआधारे पतसंस्थांचे कार्यक्षेत्र वाढ व शाखा मंजुरी प्रस्तावांना मान्यता देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहकार आयुक्तालयातील पतसंस्था शाखेतील तत्कालीन उपनिबंधक व अपर निबंधक दर्जाच्या अधिकाऱ्यांनी पतसंस्थांचे कार्यक्षेत्र वाढ व शाखा मंजुरी प्रस्तावांना मान्यता देताना गैरव्यवहार केल्याने ठेवीदारांची फसवणूक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पतसंस्थांचे कार्यक्षेत्र वाढ व शाखा मंजुरी प्रस्तावांना मान्यता देताना गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) नाही.

पतसंस्थांची नोंदणी, कार्यक्षेत्र वाढ व शाखा विस्तार याबाबत सहकार आयुक्त कार्यालयाच्या दिनांक ०३/०२/२०१४ व दिनांक ०८/०३/२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये वेगवेगळे निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार निकषांची पूर्तता करत असलेल्या प्रस्तावांना सहकार आयुक्त कार्यालयाकडून मान्यता देण्यात येते.

लेखापरिक्षकाचे बनावट प्रमाणपत्राच्या आधारे, कार्यक्षेत्रवाढ किंवा शाखा विस्तारास मान्यता दिल्याची अथवा विशिष्ट संस्थेबाबत तक्रार सहकार आयुक्त कार्यालयास प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: परभणी जिल्ह्यासह अनेक ठिकाणी बनावट खत विक्री करण्यात येत असल्याबाबत

**(३) * १७१९९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: परभणी जिल्ह्यासह अनेक ठिकाणी मे.पृथ्वी खेतीवाडी केंद्र, भावनगर, गुजरात या कंपनीने ग्रीन गोल्ड फर्टिलायझर या नावाने खत विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी परभणी जिल्ह्यात सन २०२२ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हे नोंदविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणी जिल्ह्यातील कृषि दुकानदारांकडून ई-पीओएस (ई-पॉस) मशीनचा वापर न करता शेतकऱ्यांना खताची विक्री केली जात असून भाव फलक न लावल्याने खते, बियाणे किती प्रमाणात उपलब्ध आहेत याची माहिती शेतकऱ्यांना मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हजारो कोटी रूपयांची बनावट खत विक्री करणारी सदर कंपनी कृषि विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा गैरव्यवहार करत असल्याने याबाबत मा.मुख्य सचिव यांच्यास्तरावरून सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी परभणी जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्त्यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बनावट खत विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या दुकानदार व संबंधित कंपनी यांचा परवाना रद्द करुन त्यांच्यावर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.

पोलीस स्टेशन पूर्णा येथे गुन्हा नोंद क्रमांक ०२६१, दिनांक २१/११/२०२२ अन्वये गुन्हयाची नोंद झालेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी पथकाची नेमणूक करुन जिल्ह्यातील एकूण ७८ विक्रेत्यांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये दोषी आढळलेले ८ खत विक्री केंद्राचे परवाने पुढील आदेशापर्यंत निलंबित करण्यात आलेले आहेत. तसेच, मे. पृथ्वी खेतीवाडी केंद्र, भावनगर, गुजरात या कंपनीचा खत विक्री परवाना दिनांक १५/१२/२०२२ च्या पत्रान्वये पुढील आदेशापर्यंत निलंबित करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे मोरमारवाडी (ता.मावळ, जि.पुणे) येथील डोंगर पठारावर वास्तव्यास असलेल्या कुटुंबांना न्याय मिळण्याबाबत

**(४) * १६९३६ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मोरमारवाडी (ता.मावळ, जि.पुणे) येथील डोंगर पठारावर गट क्र. ३/१/२ मध्ये ८०० एकर क्षेत्रफळापैकी ६५ ते ७० एकर शेत जमिनीवर (ना विकसित झोन) शेकडो वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या ११ कुटुंबाची घरे, गोठे असून सदर जमीन लागवड योग्य आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ओझोन लॅन्ड प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडून सदर कुटुंबांना बेदखल करण्याच्या धमक्या देण्यात येत असल्याने त्यांना न्याय देण्याबाबतची मागणी धनगर समाज विकास परिषद संघटना (ता.मावळ) यांनी मा.मंत्री, महसूल यांना दिनांक १२ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने धनगर समाज विकास परिषद संघटना (ता.मावळ) यांनी मा.मंत्री, महसूल यांना केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सदर ११ कुटुंबांना न्याय मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) मौजे मोरमारवाडी, ता.मावळ, जि.पुणे येथील गट क्र.३/२/१ एकूण क्षेत्र २९९ हे. आर. च्या कब्जेदार सदरी समाइकामध्ये ओझोन लॅन्ड प्रा.लि. व इतर १७ आणि सरकारी आकारी पड नाव दाखल आहे. सदर जमिनीचे सन १९७२-१९७३ ते २०१४-२०१५

पर्यंतचे ७/१२ पाहता पीक पाहणीतील वहिवाट सदरील श्री.धाऊ दाजी शेडगे व इतर यांच्या नावाची नोंद दिसून येते. तथापि, सदरच्या वहिवाटीची नोंद कोणत्याही आदेशाशिवाय गावकामगार तलाठी यांच्याद्वारे झाली असल्याचे दिसून येते.

मावळ तालुका धनगर समाज विकास परिषद संघटना यांनी दिनांक १०/१२/२०२२ रोजी सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर चौकशी करण्यात आली असून ओझोन लॅन्ड प्रा. लि. यांच्याकडून प्रस्तुत तक्रारदार यांचे कुटुंबाना सदर जमिनीतून बेदखल करण्यासाठी धमकी दिल्याचा कोणताही गुन्हा अथवा तक्रार दाखल झाली नसल्याबाबतचा अहवाल पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, कामशेत यांनी दिला आहे.

सदर जमिनीच्या वहिवाट सदरी असलेल्या व्यक्तींनी तहसिलदार, मावळ यांचेकडे सन २००८ मध्ये कुळकायद्यातील कलम ३२-ग मधील तरतुदीनुसार सदर जमिनीची किंमत निर्धारित करुन मिळणेसाठीचा दावा दाखल केला होता. सदर दावा तहसिलदार, मावळ यांनी त्यांच्या दिनांक १३/०१/२००९ रोजीच्या आदेशान्वये फेटाळून लावलेला आहे. त्यानंतर सदर व्यक्तींनी उपविभागीय अधिकारी, मावळ-मुळशी उपविभाग, पुणे यांचेकडे सन २०१८ मध्ये अपिल दाखल केले होते. सदर अपिल उप विभागीय अधिकारी, मावळ-मुळशी यांनी त्यांच्या दिनांक ०२/०८/२०२१ रोजीच्या आदेशान्वये फेटाळले आहे. सदरहू दोन्हीही निर्णय अर्धन्यायिक स्वरूपाचे असून सदर तक्रारदार यांना सदर जमिनीवरील कुळ हक्क स्थापित करावयाचा असल्यास त्यांनी सक्षम न्यायालयात दाद मागणे संयुक्तिक होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वन विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांना नवीन वाहने उपलब्ध करून देण्याबाबत

**(५) * १७०६४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या वन विभागातील वरिष्ठ ते कनिष्ठ अधिकारी/कर्मचारी यांची वाहने अत्यंत दयनीय अवस्थेत असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनसंवर्धन आणि वन्यजीवांचे रक्षण करणाऱ्या वन विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांना मागील आठ वर्षांपासून शासनामार्फत एकही नवे वाहन उपलब्ध करुन देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील वन विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना नवीन वाहने उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

वन विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांना मागील आठ वर्षात शासनामार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या वाहनांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| शासन निर्णय | वाहने |
|---|---|
| दिनांक १९/०९/२०१५ | १०० नवीन वाहने |
| दिनांक ०२/०२/२०१६ | १८० नवीन वाहने |
| दिनांक ३१/०३/२०१६ | १०४ नवीन वाहने |
| दिनांक ३१/०३/२०१७ | ६० नवीन वाहने |
| दिनांक ३१/०३/२०२२ | २ नवीन वाहने |

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोनापूर (ता.चार्मोशी, जि.गडचिरोली) येथे कृषि महाविद्यालयाची इमारत व वसतिगृहाच्या बांधकामास निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(६) * १७४९५ श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनापूर (ता.चार्मोशी, जि.गडचिरोली) येथील कृषि महाविद्यालयाची इमारत व मुला-मुलींच्या वसतिगृहाच्या बांधकामास सन २००९-२०१० या वर्षांत आदिवासी उपयोजनेंतर्गत टप्पा-१ करिता रुपये २९.८२ कोटींची प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन सदर इमारत व वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण झाले असल्याने टप्पा-२ चा रुपये ६३.८६ कोटींचा प्रस्ताव दिनांक ६ जून, २०१९ ला कृ.म.कृ.स.प.पुणे यांनी आदिवासी विभागाकडे सादर करुनही अद्याप टप्पा-२ निधी उपलब्ध झाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर टप्पा-२ चा रुपये ६३.८६ कोटींचा निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत सोनापूर, जिल्हा गडचिरोली येथील कृषि महाविद्यालयाकरिता टप्पा-१ च्या रुपये २९.८२ कोटी इतक्या खर्चाच्या बांधकामास शासन निर्णय दिनांक ३०/०५/२०१८ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सोनापूर कृषि महाविद्यालयाच्या उर्वरित बांधकामासाठी टप्पा-२ च्या बांधकामाकरिताचा रुपये ७६.०० कोटींचा सुधारित अंदाजपत्रकीय प्रस्ताव तांत्रिक छाननीसाठी सार्वजनिक बांधकाम परिमंडळ, गडचिरोली यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(२) आदिवासी उपयोजनेतंर्गत सुरु करण्यात आलेल्या महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत नंदुरबार कृषि महाविद्यालय व डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत सोनापूर, जि.गडचिरोली येथील कृषि महाविद्यालयाच्या बांधकामासाठी आदिवासी विकास विभागाच्या लेखाशिर्षाखाली नवीन उद्दिष्टाचा समावेश करुन बांधकामाचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव आदिवासी विकास विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामाजिक वनीकरण कार्यक्रमांतर्गत अकोट (जि.अकोला) कार्यालयामार्फत वृक्ष लागवडीच्या कामासाठी नेण्यात आलेल्या मजूरांना मजुरी मिळण्याबाबत

**(७) * १७३६७ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक वनीकरण कार्यक्रमांतर्गत अकोट (जि.अकोला) कार्यालयामार्फत वृक्ष लागवड केलेल्या रोपवनांना पाणी देणे व इतर कामांसाठी बोर्डी (ता.अकोट, जि.अकोला) येथे विविध ठिकाणी ४० मजूरांना शासकीय दरानुसार मजुरी करण्याकरिता मुकादमामार्फत नेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मजूरांना त्यांनी केलेल्या कामाची मजूरी माहे नोव्हेंबर, २०२२ पासून अद्यापपर्यंत अदा करण्यात आली नसल्याची बाब दिनांक ३ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मजूरांना त्यांनी केलेल्या कामाची मजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: खरे आहे. अकोट परिक्षेत्रातील पाणी देण्याच्या कामासाठी बोर्डी ते राहणापूर या रोपवनासह अकोट परिक्षेत्रातील इतर सर्व रोपवनांना पाणी देण्याचे काम जिल्हा उपनिबंधक, अकोला यांनी नामनिर्देशित केलेल्या मजूर कामगार सहकारी संस्थाकडून करुन घेतले आहे.

(२) हे खरे नाही. अकोट सामाजिक वनीकरण परिक्षेत्रातील बोर्डी ते राहणापूर या रोपवन स्थळावर मजूर कामगार सहकारी संस्थेची रोपांना पाणी देणे या कामाची मजुरी माहे जानेवारी, २०२३ पर्यंतची मजुरी मंजूर दराप्रमाणे अदा करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील गड-किल्ल्यांवरील बेकायदेशीर अतिक्रमणे हटविण्याबाबत

**(८) * १७२१० श्री.सुरेश धस :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्ये मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवरायांच्या अतुलनीय पराक्रमाने, अमोघ कर्तृत्वाने व पदस्पर्शाने पावन झालेल्या राज्यातील अनेक ऐतिहासिक गड-किल्ल्यांवर बेकायदेशीर अतिक्रमणे करण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणकोणत्या गड-किल्ल्यांवर बेकायदेशीर अतिक्रमणे करण्यात आली असून अशा प्रकारे ऐतिहासिक गड-किल्ल्यांवरील बेकायदेशीर अतिक्रमणे हटविणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदेशीर अतिक्रमणे हटविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) राज्यातील काही किल्ल्यांवर अतिक्रमणे झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.

परांडा (जि.उस्मानाबाद), नळदुर्ग (जि.उस्मानाबाद), औसा (जि.लातूर), नंदगिरी (जि.नांदेड), मालेगाव (जि.नाशिक), पारोळा (जि.जळगाव), सिंहगड (जि.पुणे), विशाळगड (जि.कोल्हापूर), संग्रामदुर्ग (जि.पुणे), धारावी (जि.मुंबई शहर), माहिम (जि.मुंबई शहर) या राज्य संरक्षित किल्ल्यांचे ठिकाणी व रायगड (जि.रायगड), कुलाबा (जि.रायगड), सिंधुदूर्ग (जि.सिंधुदूर्ग) या केंद्र संरक्षित किल्ल्यांचे ठिकाणी अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) होय.

वरील किल्ल्यांपैकी सिंहगड किल्ला व संग्रामदुर्ग किल्ल्यावरील अतिक्रमणे निष्कासित करण्यात आलेली आहेत.

परांडा किल्ला, नळदुर्ग किल्ला, औसा किल्ला, मालेगाव किल्ला, पारोळा किल्ला, माहिम किल्ला व धारावी किल्ला येथील अतिक्रमणे स्थानिक प्रशासनाच्या मदतीने निष्कासित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

नंदगिरी किल्ल्यावर नांदेड महानगरपालिकेचे जलकुंभ व पंपहाऊस असून सदर यंत्रणा इतरत्र हलविण्याविषयी नांदेड महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

विशाळगड या किल्ल्यावरील अतिक्रमणे निष्कासित करण्याकरीता रुपये ११७.४१ लक्ष इतकी रक्कम मंजूर करण्यात आली असून सां.बां.विभाग यांच्याकडे वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि, या प्रकरणी अतिक्रमणधारकांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने अतिक्रमणे निष्कासित करण्यास स्थगिती दिली आहे.

रायगड किल्ला, कुलाबा किल्ला, सिंधुदूर्ग किल्ला या केंद्र संरक्षित किल्ल्यांच्या ठिकाणचे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही प्राचीन स्मारके आणि पुराणवास्तूशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९५८ आणि नियम, १८५९ मधील तरतूदीनुसार भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागामार्फत स्थानिक प्रशासनाच्या मदतीने करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) येथील ऐतिहासिक पुतळा बारव विकास प्रकल्प भूसंपादनामुळे प्रलंबित असल्याबाबत

**(९) * १७६५९ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) हे गाव राजमाता जिजाबाई यांचे जन्मस्थान असल्याने या ठिकाणाला एक वेगळे ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंदखेड राजा येथील ऐतिहासिक पुतळा बारव विकास प्रकल्प भूसंपादनामुळे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) या ऐतिहासिक स्थळाच्या विकासासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) केंद्रीय पुरातत्व विभाग, नागपूर यांनी सिंदखेड राजा येथील केंद्रीय संरक्षित स्मारक पुतळा बारव करिता ४२०० चौ.मी. इतकी खाजगी जमीन थेट वाटाघाटीद्वारे खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना सादर केला आहे.

परंतु सदर प्रस्तावामध्ये भूधारकांची संमती पत्रे तसेच शोध अहवाल जोडला नसल्यामुळे याबाबतचा त्रुटी पूर्तताबाबतचा अहवाल सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी भूसंपादन संस्था यांना दिनांक २७/१२/२०२२ व दिनांक १५/०२/२०२३ चे पत्रान्वये सूचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य वन सामाजिक वनीकरण व वनविकास महामंडळ, कामगार संघर्ष समितीमधील रोजंदारी, हंगामी व कायम वनमजुरांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(१०) * १७२३० श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वन सामाजिक वनीकरण व वनविकास महामंडळ, कामगार संघर्ष समितीमार्फत रोजंदारी, हंगामी व कायम वनमजुरांच्या विविध प्रलंबित मागण्यांना न्याय मिळणेबाबत हिवाळी अधिवेशन, २०२२ या कालावधीत धरणे आंदोलन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजंदारी, हंगामी व कायम वनमजुरांच्या मागण्यांच्या स्वरुपानुसार संबंधित कर्मचाऱ्यांना कायम करणे, नियमित वेतन देणे व अन्य राज्यांप्रमाणे सेवा सुविधा देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रोजंदारी, हंगामी, कायम वनमजुरांच्या विविध प्रलंबित मागण्यांना न्याय मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य वन सामाजिक वनीकरण व वनविकास महामंडळ, कामगार संघर्ष समिती यांचे दिनांक १०/११/२०२२ चे निवेदनान्वये वन सामाजिक वनीकरण व वनविकास महामंडळ मधील रोजंदारी, हंगामी, कायम वनमजुरांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्याबाबत नागपूर हिवाळी अधिवेशनामध्ये दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता बेमुदत धरणे आंदोलन करण्याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.राज्यमंत्री (वने) व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा., नागपूर यांना निवेदन देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

महसूल व वन विभागाच्या दिनांक ३१/०१/१९९६ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१/११/१९८९ ते ३१/१०/१९९४ पर्यंत सलग ५ वर्ष योजना/योजनेत्तर अंतर्गत किमान २४० दिवस प्रती वर्ष याप्रमाणे काम केलेल्या मजुरांना दिनांक ०१/११/१९९४ पासून नियमित करण्याचा निर्णय घेतला होता. त्याचप्रमाणे महसूल व वन विभागाच्या दिनांक १६/१०/२०१२ च्या शासन निर्णयान्वये दिनांक

०१/११/१९९४ ते दिनांक ३०/०६/२००४ पर्यंत योजना / योजनेत्तर अंतर्गत प्रत्येक वर्षी २४० दिवस याप्रमाणे सलग किंवा तुटक-तुटक पध्दतीने किमान ५ वर्ष काम केलेल्या मजुरांना दिनांक ०१/०६/२०१२ पासून नियमित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सदर शासन निर्णयान्वये पात्र ठरणाऱ्या रोजंदारी मजुरांना नियमित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयातील अटी व शर्ती पूर्ण न करणारे रोजंदारी मजुर नियमित करण्यास पात्र ठरत नाहीत.

सदर शासन निर्णयानुसार हंगामी मजुरांना तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी सलगरित्या कामावर ठेवण्यात येत नाही. तसेच अनुदानाच्या उपलब्धतेनुसार मजुरांना प्रचलित दरानुसार मजूरी अदा करण्यात येते.

(३) महाराष्ट्र राज्य वन सामाजिक वनीकरण व वनविकास महामंडळ, कामगार संघर्ष समिती यांनी दिनांक १०/११/२०२२ च्या निवेदनामध्ये विविध मागण्या केल्या आहेत.

महसूल व वन विभागच्या दिनांक ३१/०१/१९९६ व दिनांक १६/१०/२०१२ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे पात्र मजूरांना नियमित करण्याचे फायदे देण्यात आले आहेत. तसेच प्रचलित शासन निर्णयानुसार जुनी पेन्शन /नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजनेचा लाभ सुध्दा संबंधितांना देण्यात आले आहेत. दिनांक ०१/११/२००५ नंतर नियमित झालेल्या अधिसंख्य मजुरांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजनेचा लाभ मंजूर करण्यात आला आहे. अधिसंख्य वनमजुर कार्यरत असताना मृत्यू झाल्यास त्यांचे वारसांना शासनाचे अनुकंपा धोरणानुसार नियुक्ती देण्यात येत आहे. अधिसंख्य वनमजुरांना प्रचलित शासन धोरणानुसार पदोन्नती व उपदान देण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विमा मिळण्याबाबत

**(११) * १७५६७ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १५९०८ ला दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात खरीप हंगामात पीक विमा योजनेंतर्गत १ लाख ६३ हजार ७४० शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले असून त्यापैकी १ लाख ५० हजार २५४ शेतकरी पीक विमा मिळण्यास पात्र आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित १ लाख ५० हजार २५४ शेतकऱ्यांपैकी १ लाख २५ हजार ६३५ शेतकऱ्यांची पीक विमा निश्चिती होऊन त्यापैकी १ लाख ९ हजार ५९३ शेतकऱ्यांच्या खात्यावर विम्याची रक्कम जमा झाली असून १६ हजार ४२ शेतकऱ्यांची रुपये १२ कोटी ४७ लाख इतकी विम्याची रक्कम विमा कंपनीकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पीक विम्यापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यात योजनेंतर्गत खरीप हंगाम सन २०२२ मध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती व काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबी अंतर्गत एकूण १,३०,८२७ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये १२६.५८ कोटी निश्चित करण्यात आली असून उत्पादनावर आधारित नुकसान भरपाई परिगणनेची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) सोलापूर जिल्ह्यात खरीप २०२२ मध्ये नुकसान भरपाई निश्चित झालेल्या शेतकऱ्यांपैकी दिनांक २२/०२/२०२३ अखेर १,१६,०८२ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये १११.३८ कोटी विमा कंपनीमार्फत वाटप करण्यात आले असून उर्वरीत १४,७४५ अर्जदारांना रुपये १३.४८ कोटी वाटपाची कार्यवाही सुरु आहे तसेच, उत्पादनावर आधारीत नुकसान भरपाई परिगणनेची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींकरिता वनाधारित विकास धोरण आखणेबाबत

**(१२) * १७०१७ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या खनिज व वनसंपदेवर आधारित उद्योग उभारून आदिवासींसाठी रोजगार निर्मिती करण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यात लोह खनिज, बांबू, तेंदुपत्ता, सागवान अशा स्वरुपात हजारो कोटींची वनसंपदा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औद्योगिक विकासांतर्गत या क्षेत्रात लोहखनिजावर आधारित प्रकल्प उभारला जात असून यात प्रामुख्याने विडी उद्योग, बांबूवर आधारीत उद्योग व नंदीगांव (ता.सिरोंचा) व देवलंबी (ता.अहेरी) येथे चुनखडीवर आधारित उद्योग तसेच वनाधारीत प्रकल्पातून भामरागड, एटापल्ली, सिरोंचा, कोरची, धानोरा या क्षेत्रांचा विकास करण्याच्या उद्देशाने उद्योग उभारण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींकरिता वनाधारित विकास धोरण आखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) गडचिरोली जिल्ह्यात मौजे सुरजागड येथे मे.लॉयड मेटल्स लि. या घटकाची लोह खनिजाची खाण सुरु असून, या खाणीतून निघणाऱ्या कच्च्या लोह खनिजावर आधारित लोह प्रकल्प (उद्योग) मे.लॉयड मेटल्स लि. यांचेकडून मौजा कोनसारी (ता.चार्मोशी, जि.गडचिरोली) येथे उभारण्यात येत असून, सदरचा प्रकल्प अंदाजे माहे मे, २०२३ पर्यंत कार्यान्वित होऊ शकेल, यामध्ये अंदाजे १५०० इतकी रोजगार निर्मिती होणार असल्याचे कंपनीकडून कळविण्यात आलेले आहे. तसेच सद्य:स्थितीत गडचिरोली जिल्ह्यात चुनखडी या प्रमुख खनिजाचा एकही खाणपट्टा सुरु नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील जंगलामध्ये मोहा, तेंदू, बांबू, आवळा, बेहडा, हिरडा इ. गौण वनोपज देणारे व औषधी उपयोगी वनस्पती विपुल प्रमाणात आहेत.

वन विभागाचे पुढाकाराने गडचिरोली जिल्ह्यात अगरबत्ती प्रकल्प, गोंडवाना हर्बस प्रकल्प, मोहा प्रक्रिया उद्योग, सागवान लाकूड इत्यादी प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

(४) गडचिरोली जिल्ह्यात वनावर आधारित उद्योग उभारणीस चालना मिळण्यासाठी, स्थानिक लोकांनी संकलित केलेल्या गौण वनोपजांना योग्य भाव मिळवून देण्याकरिता तसेच स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने गडचिरोली जिल्ह्यासाठी वनउद्योग संकुलाची निर्मिती करण्याची बाब विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यात हरभरा पिकांवर घाटे अळीचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(१३)** * **१७३१६ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात वातावरणातील बदलांमुळे रब्बी पिकांना धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे जिल्ह्यातील विशेषत: पारध (ता.भोकरदन, जि.जालना) परिसरात विविध पिकांवर व टेंभुर्णी (ता.जाफ्राबाद, जि.जालना) परिसरात हरभरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, घाटे अळीच्या प्रादुर्भावामुळे हरभरा पीक नष्ट होण्याची भिती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने माहिती घेवून येथील शेतकऱ्यांना पीक वाचविण्यासाठी कीटकनाशकांची फवारणी इ.बाबत मार्गदर्शन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

मौजे पारध (ता.भोकरदन,जि.जालना) व मौजे टेंभुर्णी (ता.जाफ्राबाद, जि.जालना) या परिसरात क्रॉपसॅप योजनेंतर्गत हरभरा पिकावरील कीड व रोग सर्वेक्षणाचे काम करण्यात आलेले असून सदरील परिसरात हरभरा पिकावरील घाटे अळीमुळे झालेल्या नुकसानाची नोंद आर्थिक नुकसान पातळीच्या खाली झालेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) मौजे पारध (ता.भोकरदन, जि.जालना) आणि मौजे टेंभुर्णी (ता.जाफ्राबाद, जि.जालना) परिसरात वेळोवेळी खरीप व रब्बी हंगामपूर्व तसेच हंगामामध्ये शेतकरी मेळावे, प्रक्षेत्र भेटींचे आयोजन करुन वेळोवेळी शेतकऱ्यांना पीक संरक्षणाबाबत मार्गदर्शन केलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पशुधनांच्या खरेदी-विक्रीचे आठवडी बाजार सुरु करण्याबाबत

**(१४)** * **१७९८८ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राज्यात पशुधनांना लम्पी या चर्मरोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे उक्त प्रादुर्भाव कमी करण्यासाठी १०० टक्के गोवर्गीय पशुधनास लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लस देणे, पशुपालकांच्या दारात मोफत वैद्यकीय उपचार करणे, पशुधनांचे गोठे व नजीकच्या परिसरात कीटकनाशके व जंतुनाशकांची फवारणी करणे आवश्यक असतानाही लम्पी रोगाचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे पशुधनांच्या खरेदी-विक्रीचे आठवडी बाजार माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान बंद करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पशुधनांचे खरेदी-विक्री बाजार बंद केल्याने राज्यात विशेषत: अहमदनगर जिल्ह्यात ३ महिन्यांत सुमारे रुपये ३५० कोटींपेक्षा अधिक रकमेचा होणारा व्यवहार झाला नसल्याने स्थानिक नागरिकांचा रोजगार अडचणीत येऊन त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अहमदनगर जिल्ह्यातील पशुधनांच्या खरेदी-विक्रीचा आठवडी बाजार पुन्हा सुरु करण्याबाबत दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना लम्पी चर्मरोगाचा आढावा घेतल्यानंतर नियंत्रित क्षेत्रात कोणताही प्राणी बाजार भरविण्यास परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव कमी करण्याबाबत तसेच पशुधनांच्या खरेदी-विक्रीचा आठवडी बाजार सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) केंद्र शासनाच्या प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ मधील कलमान्वये या विभागाची अधिसूचना दिनांक ०८/०९/२०२२ अन्वये लम्पी चर्मरोगाच्या बाबतीत संपूर्ण राज्याचे क्षेत्र नियंत्रित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले होते.

सदर अधिनियमान्वये लम्पी चर्मरोग प्रादुर्भाव नियंत्रित ठेवण्यासाठी पशुधनांचे खरेदी-विक्रीचे बाजार बंद ठेवणे बंधनकारक होते. तथापि, शेळया मेंढयांचे खरेदी-विक्रीचे बाजार सुरु होते. या विभागाची अधिसूचना दिनांक २१/११/२०२२ अन्वये राज्यात म्हशींचे बाजार भरविण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

(३), (४) व (५) राज्यातील सर्व गोवंशीय पशुंचे लसीकरण, बाधित पशुंना जागेवर मोफत उपचार, कीटकनाशकांची फवारणी इ. उपाययोजना तातडीने राबवून लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कार्यवाही करण्यात आलेली आहे.

या विभागाची अधिसूचना दिनांक २९/११/२०२२ अन्वये अहमदनगर जिल्ह्यासह राज्यातील सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, यांना त्यांच्या जिल्ह्यातील लम्पी चर्मरोगाचा आढावा घेतल्यानंतर नियंत्रित क्षेत्रात कोणताही प्राणी बाजार भरविण्यास प्राधिकृत करण्यात आलेले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी अहमदनगर जिल्ह्यातील पशुधनांच्या खरेदी-विक्रीचे सर्व आठवडी बाजार सुरु केलेले आहेत.

-----------------

## वन विभागात कंत्राटी पध्दतीने कार्यरत असणाऱ्या सेवानिवृत्त वनाधिकाऱ्यांना प्रलंबित वेतन मिळणेबाबत

**(१५) * १८०९९ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वन विभागातील विविध पदे रिक्त असल्याने सदर पदांवर सेवानिवृत्त वनाधिकाऱ्यांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटी पध्दतीने कार्यरत असणाऱ्या काही सेवानिवृत्त वनाधिकाऱ्यांचे प्रलंबित असलेले वेतन मिळण्याकरिता सेवानिवृत्त वनाधिकाऱ्यांना वनसंरक्षक कार्यालयात जावून पाठपुरावा करावा लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ३२ वर्षे सेवा करुनही प्रलंबित असलेल्या तिसऱ्या आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्याची मागणी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी प्रधान सचिव, वनसंरक्षक कार्यालय, मानव व संसाधन विभाग यांना केली असतानाही सदरहू सेवानिवृत्त अधिकाऱ्याने केलेल्या मागणीच्या अनुषंगाने अद्याप कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वन विभागातील विविध पदे कायमस्वरुपी भरणे, कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या सेवानिवृत्त वनाधिकाऱ्यांना वेतन मिळणे तसेच प्रलंबित आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

वन विभागामध्ये सेवानिवृत्तीनंतर कंत्राटीपध्दतीने ३ विभागीय वन अधिकारी, १ वरिष्ठ स्वीय सहायक, १ मुख्य वनसंरक्षक व १ वनक्षेत्रसर्वेक्षक अशा एकूण ६ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची मानधनावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यापैकी एका अधिकाऱ्याचे ५ महिने कालावधीचे मानधन प्रलंबित आहे. सदर प्रलंबित मानधन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

वित्त विभागाच्या दिनांक ०२/०३/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२३ वर्षामध्ये पात्र वन अधिकाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्यात येत आहे.

(४) वन विभागातील रिक्त पदे सरळसेवा व पदोन्नतीद्वारे कायमस्वरुपी भरण्याची कार्यवाही सुरु आहे. कंत्राटी पध्दतीने नियुक्त एका वन अधिकाऱ्याचे प्रलंबित वेतन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे सन २०२३ वर्षामध्ये पात्र वन अधिकाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्यात येत आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## वरळी येथील ऐतिहासिक किल्ल्याच्या संवर्धनासाठी निधीची तरतूद करण्याबाबत

**(१६) * १८३१६ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्ये मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत राज्यातील गड-किल्ले, मंदिरे व महत्वाची संरक्षित स्मारके इत्यादींच्या संवर्धनासाठी नियोजन विभागामार्फत आर्थिक वर्ष २०२३-२०२४ पासून पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी ३ टक्के निधीची तरतूद करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतिहासाची साक्ष देणाऱ्या मुंबईतील वरळी येथील किल्ल्याची दुरवस्था झाली असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत वरळी येथील ऐतिहासिक किल्ल्याच्या संवर्धनासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अशी बाब निदर्शनास आली नाही.

प्रश्नाधीन किल्ल्याच्या जतन व दुरुस्ती, सुशोभिकरणाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. सदर कामे पूर्ण झाल्यावर कामाचा वाव असल्यास अंदाजपत्रके तयार करुन आवश्यक त्या निधीची मागणी करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर-नागभीड रेल्वे मार्गाचे बांधकाम करण्यासाठी कुही परिसरातील काढण्यात आलेली माती कंत्राटदाराने विकल्याबाबत

**(१७) * १८०८८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-नागभीड ब्रॉडगेज रेल्वे मार्गाचे बांधकाम करण्यासाठी जीजीएम महारेल, नागपूर यांचे अंतर्गत उमरेड जवळ कुही परिसरात ट्रॅक टाकण्याच्या कामासाठी काढण्यात आलेली माती पी.रमण्णा कंपनीने विकून शासनाचा महसूल बुडविल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ट्रॅक टाकण्याच्या कामासाठी काढण्यात आलेली माती रेल्वे ट्रॅकच्या बाजूची जागा समतोल करण्यासाठी आवश्यक असताना कंत्राटदाराने महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन मातीची विक्री केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मातीची विक्री करणाऱ्या कंत्राटदार व संबंधित विभागाच्या दोषी अधिकारी /कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) नागपूर- नागभीड ब्रॉडगेज रेल्वे मार्गाचे मौजा-आकोली येथील रेल्वेचे गट क्र.१२६, १२९, १३०, १३२, २२/१, ३७७, ३७८, ३७९, ३८०, ३८१, ३८२ येथील मौक्का चौकशी (तलाठी/मंडळ अधिकारी) मध्ये २६०६ ब्रास माती/मुरूम अवैधपणे उत्खनन वाहतूक केल्याचे आढळून आल्याने तहसिलदार, कुही यांचेकडून संबंधितास दिनांक ०९/०२/२०२३ रोजीच्या आदेशान्वये रुपये १,९८,०५,६००/- एवढया रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

-----------------

## खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरात खाडी किनारपट्टीवरील कांदळवनाची कत्तल करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(१८)** * **१८४३५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सायन-पनवेल महामार्गालगत असणाऱ्या खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) जवळील खाडी किनारपट्टीनजीक असलेले कांदळवन अज्ञात लोकांकडून रसायने टाकून नष्ट करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खारघर आणि रोडपाली परिसरातील खाडी किनारपट्टीनजीक बेकायदेशीररित्या मत्स्यशेती करण्यासाठी कांदळवन जाळण्यात येऊन तलावाची निर्मिती करुन त्यात खाडीचे पाणी वापरण्यात येत असल्यामुळे पर्यावरणाची हानी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खारघर खाडी परिसरात होत असलेल्या अतिक्रमणाबाबत पर्यावरणप्रेमींनी वन विभागाकडे पत्रव्यवहार केल्यामुळे संबंधितांवर तात्पुरती कारवाई करण्यात आली असून अज्ञात लोकांकडून पुन्हा कांदळवने नष्ट करण्यात येत असल्याने सदर परिसर ओस पडत आहे त्यामुळे पर्यावरणप्रेमींनी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खारघर खाडी परिसरात कांदळवनाची बेकायदेशीररित्या कत्तल करणाऱ्या दोषींवर व त्यांच्यावर कारवाई करण्यास दिरंगाई करणाऱ्या वन विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

तथापि, मौजे खारघर सर्व्हे नं. ८२ मध्ये कांदळवनालगत इंजायली झाडे, सुकलेले गवत व पालापाचोळा यांना आग लागली होती. सदरच्या आगीमध्ये कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही. तसेच रसायने टाकून कांदळवने जाळण्याचा प्रकार दिसून आलेला नाही.

(२) हे खरे नाही.

मौजे रोडपाली व मौजे खारघर परिसरातील खाडी भागात बेकायदा मत्स्य शेती केल्याचे दिसून आलेले नाही.

(३) व (४) खारघर येथे खारफुटीचा नाश व डंपिग होत असल्याबाबत ई-मेलद्वारे तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असून सेक्टर १० मध्ये सायन-पनवेल राष्ट्रीय महामार्गालगत खारघर सर्व्हे नं. ८०, ८१, ८३ मध्ये स्थानिक मच्छिमार यांनी सिमेंट गोण्यांमध्ये डेब्रीज भरुन कच्च्या मातीचा बांध तयार केल्याचे आढळून आले. सदर बांध दिनांक १३/१०/२०२२ व दिनांक १४/१०/२०२२ रोजी निष्कासित करण्यात आले आहेत आणि पाण्याचा नैसर्गिक प्रवाह सुरु करण्यात आलेला आहे.

तसेच सबंधित अतिक्रमण धारकांवर कारवाई करण्यासाठी उप विभागीय अधिकारी, पनवेल व महाव्यवस्थापक (पर्यावरण व वने) सिडको यांना दिनांक २४/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करकंब व बार्डी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील द्राक्ष पिकांचे तणनाशकाच्या फवारणीमुळे नुकसान झाल्याबाबत

**(१९) * १७७८६ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करकंब व बार्डी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील शेतकऱ्यांनी द्राक्ष पिकाची छाटणी करण्याअगोदर द्राक्ष बागेत विविध कंपन्यांच्या तणनाशकांची फवारणी केली असून सदर तणनाशकांपैकी ग्लायफोसेट (ग्लायसटॉप- ४१) या तणनाशकाची फवारणी करुन दीड महिन्याचा कालावधी उलटून गेल्यानंतरही द्राक्षबागा फुटल्या नसल्यामुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ग्लायफोसेट (ग्लायसटॉप- ४१) या तणनाशकाच्या विक्रीला परवानगी नसतानाही उक्त तणनाशक फवारल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून याबाबतची तक्रार शेतकऱ्यांनी कृषि विभागाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत मा.सदस्यांनी सभागृहात सन २०२२ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये मुद्दा उपस्थित केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीनुसार कारवाई करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यामध्ये ग्लायफोसेट तणनाशक विक्रीला बंदी नाही. तथापि, ग्लायस्टॉप-४१ हे ग्लायफोसेट या कीटकनाशकाचे मे. मॉडर्न ॲग्री जेनेटिक्स लि. कंपनीचे व्यापारी नाव असून, सदर कंपनीस राज्यामध्ये विक्री परवाना नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणाच्या करण्यात आलेल्या चौकशीत तणनाशकाच्या पॅकींगवर मे.मॉडर्न ॲग्री जेनेटिक्स लि. या उत्पादकाचे नाव आढळून आले. मे. मॉर्डर्न ॲग्री जेनेटिक्स व तिचे वितरक यांच्याविरुध्द भारतीय दंड संहिता अन्वये गु.र. नं. ०३९८/२०२२, दिनांक १८/११/२०२२ अन्वये पोलीस स्टेशन करकंब, ता.पंढरपूर येथे दाखल करण्यात आला आहे. मे. मॉडर्न ॲग्री जेनेटिक्स लि. या कंपनीचे Online (Digital) Principal Certificate दिनांक १३/०२/२०२३ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आले आहे. तसेच, मे. मॉडर्न ॲग्री जेनेटिक्स लि. या कंपनीच्या उत्पादन अथवा विपणन केलेल्या सर्व कीटकनाशकांना पुढील एक वर्षासाठी राज्यात विक्रीसाठी बंदी घालण्यात आली आहे. सदर कीटकनाशकाची राज्यात विक्री करणाऱ्या मे. विश्वास ॲग्रो केमिकल्स या कंपनीचा परवाना दिनांक १३/०२/२०२३ च्या आदेशान्वये एक वर्षासाठी निलंबित करण्यात आला आहे. मे. मॉडर्न ॲग्री जेनेटिक्स कंपनीचे संचालक मंडळ व अन्य यांचेविरुध्द प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पंढरपूर यांचेकडे दिनांक २२/०२/२०२३ रोजी दावा दाखल करण्यात आला आहे. कीटकनाशक अधिनियम १९६८ व कीटकनाशक नियम, १९७१ मधील तरतुदीनुसार कीटकनाशक निर्मिती कंपनीकडून आर्थिक नुकसान भरपाई देणेबाबत कोणतीही तरतूद नाही. सबब, शेतकऱ्यांना तक्रार निवारण समितीच्या अहवालाची प्रत देऊन ग्राहक मंच, सोलापूर येथे दावा दाखल करणेसाठी कृषि विभागाकडून मार्गदर्शन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा मोगरा (अंधेरी) येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे विकासकाने महसूलाचा अपहार केल्याबाबत

**(२०) * १८२४५ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा मोगरा (अंधेरी) येथील भूखंड क्र. ४३१, ३४६, ३४८ बाबत बनावट कागदपत्रांच्या आधारे डीड ऑफ कन्व्हेन्स मध्ये खोटी माहिती देवून सॅटेलाईट डेव्हलपर्स प्रा. लि. व ओमकार रिअल्टर्स, अंधेरी प्रोजेक्ट प्रा.लि. यांनी संगनमत करून करोडो रुपयांच्या महसूलाचा अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित विकासकास मुद्रांक जिल्हाधिकारी, अंधेरी यांनी रुपये १,११,५७,२००/- इतके मुद्रांक शुल्क जमा करण्याची नोटीस दिली असल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित विकासकाकडून मुद्रांक शुल्क वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

परंतु महसूलाचा अपहार नसून नुकसान झालेले आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे. परंतु मुद्रांक जिल्हाधिकारी, अंधेरी यांनी सहा प्रकरणांमध्ये संबंधित विकासकास रूपये १,११,५७,२००/- इतके मुद्रांक शुल्क जमा करण्याची नोटीस दिनांक २२/१०/२०१८ रोजी दिलेली आहे.

(३) होय. सदर तक्रारीच्या अनुषंगाने एकूण ६ प्रकरणामध्ये रुपये १,११,५७,२००/- मुद्रांक शुल्क भरणेबाबत विकासकास नोटीस देण्यात आलेली होती. यापैकी ५ अभिनिर्णय प्रकरणामध्ये रुपये ६६,४१,७५०/- इतके मुद्रांक शुल्क वसूल करण्यात आलेले आहे. व एका प्रकरणामध्ये महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम ५३-अ अन्वये कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुलगाव, विजयगोपाळ व भिडी (ता.देवळी, जि.वर्धा) या मंडळांचा पीक विम्यामध्ये समावेश केला नसल्याबाबत

**(२१) * १७५१६ श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुलगाव, विजयगोपाळ व भिडी (ता.देवळी, जि.वर्धा) येथे रब्बी हंगामात चणा व गहू या पिकांचे उत्पादन मुबलक प्रमाणात करण्यात येत असून सदर मंडळांचा पीक विम्यामध्ये समावेश करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतानाही महसूल विभागाच्या चुकीमुळे तीनही मंडळांचा समावेश पीक विम्यामध्ये करण्यात आला नसल्याचे दिनांक १४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महसूल विभागाच्या चुकीमुळे सदर परिसरातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) प्रधानमंत्री पीक विमा योजना ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येते. योजनेंतर्गत पीक हे मंडळ/ मंडळ गट व तालुकास्तरावर अधिसूचित करताना नवीन मंडळ/मंडळ गट व तालुक्याचे संबंधित पिकाचे किमान ३००० हेक्टर क्षेत्र आवश्यक आहे. त्यास अनुसरुन पीक विमा योजनेंतर्गत देवळी तालुक्यात गहू पिकाकरिता देवळी, अंदोरी, गिरोली, पुलगाव, विजयगोपाल व भिडी (६ महसूल मंडळे) व हरभरा पिकाकरिता देवळी, अंदोरी व गिरोली (३ महसूल मंडळे) अधिसूचित आहेत.

योजनेंतर्गत रब्बी हंगाम सन २०२२-२०२३ मध्ये देवळी तालुक्यातील २०८ शेतकऱ्यांनी सहभाग घेऊन १३२.८८ हे. क्षेत्र अधिसूचित केले आहे. हंगामाच्या अखेर पीक कापणी प्रयोगाव्दारे प्राप्त सरासरी उत्पादनाची तुलना उंबरठा उत्पादनाशी करुन नुकसान भरपाई निश्चितीची कार्यवाही करण्यात येते.

(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिरकणीवाडी (ता.महाड, जि.रायगड) येथील ग्रामस्थांना रायगड किल्ल्यावर दही, दूध, ताक इ. पेय विकण्यास परवानगी मिळण्याबाबत

**(२२) * १७२१५ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्ये मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवरायांच्या काळात स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड परिसरातील गावे व वाड्यांमधील ग्रामस्थ गडावर दही, ताक, सरबत या पेयांची विक्री करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड किल्ला परिसरातील हिरकणीवाडीतील स्त्रियांना व ग्रामस्थांना दही, दुध, ताक गडावर विकण्यास परवानगी होती तथापि, कोरोना संसर्गाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे गडाच्या महाद्वाराबाहेरपर्यंतच सदरहू पेय विकण्यास परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत कोरोना या साथीच्या रोगाची लाट संपुष्टात आली असून गडाच्या परिसरातील परंपरागत व्यवसायावर बंदी आणल्याने पर्यटक, मावळे व हिरकणीवाडीतील स्त्रियांमध्ये असंतोष निर्माण होऊन त्यांच्यामार्फत गडावर दही, दूध, ताक विकण्यास परवानगी मिळण्याबाबत आग्रह करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रायगड किल्ल्यावर हिरकणीवाडीतील स्त्रियांना व ग्रामस्थांना दही, दूध, ताक ही पेय विकण्यास परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रश्नाधीन किल्ला भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळाच्या अखत्यारित असून याबाबतची कोणतीही विनंती अधिक्षण पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मुंबई मंडळ या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे सुकळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे हिंस्त्र प्राण्याच्या हल्ल्यामध्ये मृत्युमूखी पडलेल्या शेळ्यांच्या पशुपालकांस नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(२३) * १७६४६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सुकळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे बंदिस्त गोठ्यातील ७ शेळयांवर हिंस्त्र प्राण्याने हल्ला करुन त्यांना ठार केल्याची घटना दिनांक १७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मृत्युमुखी पडलेल्या शेळयांच्या पशुपालकास नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) श्री.माणिकराव सांडू पाटील, रा. सुकळी, ता.मुक्ताईनगर यांच्या मालकीच्या ५-बकऱ्या व २-बोकड असे एकूण ७ पशुधनांचा बिबट या वन्यप्राण्याच्या हल्ल्यात दिनांक १६/०९/२०२२ रोजी मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त व्यक्तीस नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील सावकारांच्या फायनान्स व्यवसायास आळा घालण्याबाबत

**(२४)** * **१७६०५ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात एकापेक्षा अधिक सावकारांनी एकत्र येऊन फायनान्स नावाने सावकारी सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सावकारी चालविण्यासाठी भरमसाठ कर्जाच्या व्याजदराबरोबरच ठेवींच्या आकर्षक व्याजदराचे अमिष दाखवून ठेवी ठेवून घेतल्याची प्रकरणे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत जिल्हा निबंधक कार्यालयाकडे फायनान्स बाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील सावकारांच्या फायनान्स व्यवसायास आळा घालून जिल्हा निबंधक कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या तक्रारींचे निराकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) नाही.

सोलापूर जिल्ह्यात माहे जानेवारी, २०२३ अखेर ११६० परवानाधारक सावकार आहेत. त्यापैकी २७६ भागीदारी फर्मना सावकारी व्यवसायाचा परवाना देण्यात आला आहे.

(२), (३) व (४) सावकारी चालविण्यासाठी भरमसाठ कर्जाच्या व्याजदराबरोबरच ठेवींच्या आकर्षक व्याजदराचे अमिष दाखवून ठेवी ठेवून घेतल्याबाबत श्री.सचिन माळी व इतर यांनी मे. वरदलक्ष्मी बालाजी फायनान्स व मे.श्री.व्ही.एल. बालाजी फायनान्स यांचे विरुध्द दिनांक ०१/११/२०२१ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांचेकडे तक्रार केली होती.

तथापि, उपरोक्त संस्थांनी सन २०१५-२०१६ नंतर सावकारी परवाना घेतला नसल्याने तसेच तक्रारदारांनी उपरोक्त नमूद संस्थामध्ये सन २०१६ नंतर ठेवी ठेवल्याचे निदर्शनास आल्याने तक्रारदाराने योग्य प्राधिकरणाकडे दाद मागणेबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांनी दिनांक २८/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले आहे.

तसेच तालुकास्तरावरील सहाय्यक निबंधक कार्यालयातून सर्व परवानाधारक सावकारांना ठेवी न स्विकारणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याबाबत

**(२५) * १८३९७ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यांतर्गत नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था (सोसायटी) सहकार विभागाखाली येत असून सोसायटीतील तक्रारींची दखल सहकार विभागाला घेणे क्रमप्राप्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकारी गृहनिर्माण संस्था (सोसायटी) यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींची दखल घेण्यास सहकार विभागाचा बराच वेळ खर्ची पडत असल्याने त्याकरिता स्वतंत्र विभाग स्थापन करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून (सोसायटी) प्राप्त झालेल्या तक्रारींच्या निवारणासाठी स्वतंत्र आयुक्त, स्वतंत्र उपनिबंधक व निबंधक कार्यालये सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय.

(२) स्वतंत्र विभाग स्थापन करण्याची आवश्यकता नाही. सहकार आयुक्त कार्यालयाने दिनांक २६/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये "सहकारी गृहनिर्माण संस्था-सुव्यवस्थापन व तंटामुक्त संस्था अभियान" राबविणेच्या सूचना दिलेल्या आहेत. यात हाऊसिंग फेडरेशनचाही सहभाग असल्यामुळे तक्रारींची संख्या कमी होण्यास मदत होऊ शकेल.

(३) असा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महाराष्ट्र कलाकार कल्याण मंडळ स्थापन करण्याबाबत

**(२६) * १८४३० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्ये मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महाराष्ट्र कलाकार कल्याण मंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मंडळ स्थापनेबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने संचालक, सांस्कृतिक कार्ये संचालनालय यांच्याकडून दिनांक १० फेब्रुवारी, २०२२, दिनांक १० मे, २०२२ व दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये माहिती मागविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र कलाकार कल्याण मंडळ स्थापन करण्याकरिता प्राप्त झालेल्या माहितीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर बाब धोरणात्मक असून शासन सकारात्मक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजेबाळे (जि.सोलापूर) परिसरात नवीन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(२७) * १६९३९ श्री.गोपिचंद पडळकर : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक ८७०२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात १९ व्या पशु गणनेप्रमाणे गाय, बैल, म्हैस, पशुधनासह ११.६८ लाख शेळ्या, मेंढ्या ८.९९ लाख व कुक्कुटपालन ६ ते ८ लाख इतके पशुधन असून यामध्ये सोलापूर भागात प्रसिध्द असलेली शेतीसाठी खिलार तर दुधासाठी पंढरपुरी म्हैस ही जिल्ह्याची ओळख आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्ह्यात शेळी व दख्खनची मेंढी ही जात मेंढीपालन व लोकरीसाठी प्रसिध्द आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पशुधनांचे जतन, वंश सुधारणा, नवीन दूध उत्पादन देणाऱ्या जाती निर्माण व संशोधन, पशुधन कृषि विस्तार विषयक बाबींची पशुपालकांना माहिती देणे तसेच आधुनिक पशुचिकित्सा इत्यादीबाबत कोरडवाहू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण सुविधा उपलब्ध होण्यासाठी मौजेबाळे (जि.सोलापूर) परिसरात नवीन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरू होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मौजेबाळे (जि.सोलापूर) परिसरात शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यास तत्कालीन मुख्यमंत्री यांनी तत्वतः मान्यता दिलेली होती तथापि, अद्यापपर्यंत सदरहू महाविद्यालय सुरु करण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने सदरहू महाविद्यालयाच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन त्याकरिता लागणारा आवश्यक निधी मंजूर करण्याची मागणी अनेक लोकप्रतिनिधी यांच्याकडून शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मौजेबाळे (जि.सोलापूर) परिसरात शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) हे खरे आहे.
(३), (४), (५) व (६) विद्यापीठाच्या बृह्त आराखड्यास मान्यता मिळाल्यानंतर सोलापूर जिल्ह्यात नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत यथोचित निर्णय घेण्यात येईल, असा निर्णय तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने दिनांक ०५/११/२०२० रोजी घेण्यात आला. त्याअनुषंगाने विद्यापीठाला बृह्त आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विद्यापीठाकडून बृह्त आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## विरार (पूर्व) येथील खार्डी–डोलीव गावानजीकच्या केलेल्या भूसुरुंग स्फोटामुळे स्थानिकांच्या मालमत्तेची हानी झाल्याबाबत

**(२८) * १८१८५ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई–वडोदरा एक्सप्रेस महामार्गाच्या कामासाठी विरार (पूर्व) येथील खार्डी–डोलीव गावानजीक असलेल्या डोंगराला पोखरण्यासाठी भूसुरुंग स्फोट केल्यामुळे स्थानिकांच्या घरांना तडे गेले असल्याचे दिनांक २६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विरार (पूर्व) येथील खार्डी–डोलीव गावानजीक असलेल्या डोंगराला पोखरण्यासाठी भूसुरुंग स्फोट केल्यामुळे स्थानिकांच्या झालेल्या मालमत्ता हानीची पाहणी करुन स्थानिक ग्रामस्थांना नुकसान भरपाई अदा करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विरार (पूर्व) येथील खार्डी–डोलीव गावानजीक करण्यात येत असलेले भूसुरुंग थांबविण्याबाबत तसेच ग्रामस्थांची मालमत्ता हानी भरुन काढण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) मुंबई-वडोदरा एक्सप्रेस महामार्गाच्या कामासाठी विरार (पूर्व) येथील खार्डी-डोलीव गावानजीक असलेल्या डोंगराला पोखरण्यासाठी भुसुरूंग स्फोट केल्यामुळे स्थानिकांच्या घरांना तडे गेले असल्याची तक्रार दिनांक १६/०१/२०२३ रोजी जिल्हाधिकारी, पालघर यांना प्राप्त झाली.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांनी केलेल्या चौकशी अहवालानुसार मे.जी.आर.इंन्फ्रा प्रोजेक्ट लि. कंपनीस भारतमाता परियोजनांतर्गत मुंबई ते वडोदरा एक्सप्रेस हायवे (शिरसाड ते मासवण) या प्रकल्पाचे काम देण्यात आले असून सदर कंपनी मौजे डोलीव येथील स.नं. १३२ व १४६ या ठिकाणी खडक खोदताना ब्लास्टिंगचा वापर केल्यामुळे सदर परिसरातील ४६ घरांना तडे गेले असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यानुषंगाने, जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक १७/०२/२०२३ च्या पत्रान्वये व्यवस्थापक, जी.आर. इंन्फ्रा प्रा. लि. यांना मर्यादेप्रमाणेच ब्लास्टींग करणे व त्यासाठी दिलेल्या अटी व शर्तींचे पालन करण्यात यावे. तसेच, गावकऱ्यांना विश्वासात घेऊन नुकसान झालेल्या घरांची दुरुस्ती करुन द्यावी व यापुढे अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत याची खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

-----------------

## एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रमांतर्गत वर्धा जिल्ह्यामध्ये तलंगा गटाचे वाटप करण्याबाबत

**(२९) * १७४९२ श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रमामार्फत जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत तलंगा गट वाटप योजना राबविण्यात येत असून सदर योजना सर्वसाधारण गटातील सर्व लाभार्थ्यांकरिता उपलब्ध आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत सर्व प्रवर्गांतील लाभार्थींना ५० टक्के अनुदानावर ८ ते १० आठवडे वयाच्या तलंगांच्या २५ माद्या आणि तीन नर याप्रमाणे गटाचे वाटप करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्धा जिल्हा परिषदेतर्गत सन २०२१-२०२२ या वर्षांत पशुसंवर्धन विभागाला रुपये १५ लाखांचा निधी प्राप्त होवूनही जिल्ह्यातील ५०० लाभार्थ्यांना तलंगा गटाचे वाटप झाले नसल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना तलंगा गटाचे वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) सदर योजनेंतर्गत सर्व प्रवर्गातील निवड झालेल्या लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदानावर ८ ते १० आठवडे वयाच्या २५ माद्या आणि ०३ नर किंवा १०० एक दिवसीय सुधारित कुक्कुट पक्ष्यांच्या पिल्लांचे वाटप करण्यात येते.

(३), (४) व (५) एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रमासाठी जिल्हा नियोजन समितीकडून रुपये १२.०० लक्ष व रुपये ३.०० लक्ष निधी अनुक्रमे दिनांक १७/०२/२०२२ आणि दिनांक १७/०३/२०२२ रोजी पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

सदर योजनेंतर्गत सर्वसाधारण आणि आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत अनुक्रमे ३९९ व २०० लाभार्थ्यांची निवड करण्यात येवून या लाभार्थ्यांना वर्धा जिल्ह्यामध्ये खाजगी भागीदारी तत्वावर कार्यरत ०५ एकात्मिक कुक्कुट विकास प्रकल्पांना तालुकानिहाय तलंगा गटाचे वाटप करण्याकरिता पुरवठा आदेश दिनांक १७/१०/२०२२ रोजी देवून तलंगा पुरवठ्याबाबत नियमित पाठपुरावा करण्यात आला होता.

त्यानुसार वर्धा जिल्ह्यातील एकूण ०८ पंचायत समित्यांपैकी सात तालुक्यांतील लाभार्थ्यांना तलंगा वाटपाची १०० टक्के प्रक्रिया पूर्ण झालेली असून, देवळी तालुक्यातील ११७ लाभार्थ्यांपैकी ५९ लाभार्थ्यांना तलंगांचे वाटप करण्यात आलेले असून, उर्वरित ५८ लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्य वन्यजीव मंडळ स्थापन करणेबाबत

**(३०) * १८१९४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने स्थापन केलेले राज्य वन्यजीव मंडळ बरखास्त करुन सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कालावधी उलटून गेल्यानंतरही नवीन वन्यजीव मंडळ स्थापन करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवीन वन्यजीव मंडळ स्थापनेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) राज्य वन्यजीव मंडळावरील पदसिध्द सदस्य वगळता १२ अशासकीय सदस्य व १ अशासकीय संस्था यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे.
(२) राज्य वन्यजीव मंडळाची पुनर्रचना करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेवाडा वन्यजीव बचाव केंद्र (नागपूर) येथील चार वाघ आणि चार बिबट्यांना जामनगर वन्यजीव बचाव केंद्रात दाखल केल्याबाबत

**(३१) * १८४०१ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेवाडा वन्यजीव बचाव केंद्र (नागपूर) येथील चार वाघ आणि चार बिबटे यांना जामनगर वन्यजीव बचाव केंद्र, गुजरात येथे दाखल करण्यात आल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाकडून शिक्कामोर्तब करण्यात आलेल्या "साहेबराव" या वाघाला गुजरात येथील जामनगर येथे न नेता इतर वाघ व बिबट्यांना त्या ठिकाणी नेण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गोरेवाडा प्रशासनाकडून लहानसहान घटनेचे प्रसिध्दीपत्रक काढण्यात येते तथापि, याप्रकरणी केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाच्या नियमांचे उल्लंघन करण्यात येऊनही सदर बाब प्रसारमाध्यमांसमोर आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर जिल्ह्यातील गोरेवाडा वन्यजीव बचाव केंद्रामधील चार वाघ आणि चार बिबटे कोणतीच पूर्वपरवानगी न घेता गुजरात येथे पाठविण्यात आल्याने गोरेवाडा प्रशासनावर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) गोरेवाडा वन्यप्राणी बचाव केंद्र, नागपूर येथील चार वाघ (दोन नर, दोन मादी) आणि चार बिबटे (तीन नर, एक मादी) या वन्यप्राण्यांना ग्रीन्स झूलॉजिकल, रेस्क्यु ॲण्ड रिहॅबिलीटेशन सेंटर, जामनगर, गुजरात येथे पाठविण्यास दिनांक १३/०१/२०२३ रोजी केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी परवानगी दिली आहे. वन विभागाकडून साहेबराव असे कोणत्याही वाघाचे नामकरण करण्यात आलेले नाही. तसेच केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण यांचेकडून प्राप्त परवानगीमध्ये केवळ वन्यप्राण्यांची प्रजाती व लिंग नमूद करण्यात आले असून प्राण्यांचे विशिष्ट नाव नमूद करण्यात आलेले नाही.

केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी दिलेल्या परवानगीनुसार दिनांक २१/०१/२०२३ रोजी गोरेवाडा वन्यप्राणी बचाव केंद्र, नागपूर येथील चार वाघ (दोन नर, दोन मादी) आणि चार बिबटे (तीन नर, एक मादी) या वन्यप्राण्यांना ग्रीन्स झूलॉजिकल, रेस्क्यु ॲण्ड रिहॅबिलीटेशन सेंटर, जामनगर, गुजरात येथे पाठविण्यात आले आहे.
(३) गोरेवाडा वन्यप्राणी बचाव केंद्र येथे वन्यप्राणी दाखल करुन घेणे किंवा अन्यत्र स्थलांतरीत करणे हे बचाव केंद्राकडे असलेल्या कर्तव्यांपैकी नियमित कामकाजाचा भाग असल्यामुळे त्यासाठी प्रसिध्दीपत्रक जारी करण्यात आलेले नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत वैयक्तीक शेततळयांचा समावेश करण्याबाबत

**(३२) * १८४३१ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मागेल त्याला शेततळे आणि सामुहिक शेततळे या योजना बंद झाल्यानंतर मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेचा विस्तार करण्यात येऊन त्यामध्ये वैयक्तीक शेततळयांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात या योजनेंतर्गत सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात १३ हजार ५०० शेततळे करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निर्णयास सहा महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही कृषि विभागामार्फत सदरहू योजनेस प्रसिद्धी देण्यात आली नसल्याचे दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात सदरहू योजनेंतर्गत ठरविण्यात आलेली उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे अंशत: खरे आहे.

"मागेल त्याला शेततळे" ही योजना माहे एप्रिल, २०२० पासून स्थगित केली आहे. तथापि, एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रमाच्या राष्ट्रीय फलोत्पादन योजनेंतर्गत सामूहिक शेततळे ही योजना कार्यान्वित आहे. मागेल त्याला शेततळे या योजने ऐवजी "मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत वैयक्तीक शेततळे" ही योजना मंजूर केली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सन २०२२-२०२३ करिता १३३३३ शेततळी खोदाईचा लक्ष्यांक निर्धारित केला आहे.

(३) हे खरे नाही.

मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत वैयक्तीक शेततळे या योजनेच्या दिनांक ०७/११/२०२२ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांन्वये योजनेची प्रचार व प्रसिध्दी करण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात आले आहे. दिनांक २७/०२/२०२३ अखेर महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त झालेल्या ११९६२ अर्जांपैकी ५३०० अर्जांची लॉटरीद्वारे निवड झाली आहे. निवडलेल्या ५३०० अर्जांपैकी २१९९ शेतकऱ्यांनी कागदपत्रे अपलोड केली आहेत. त्यापैकी ८९३ अर्जांना पूर्वसंमती दिली आहे. अनुदान वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.